वरुड
दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
वरुड | बुधवार
१०.०९.२०२६
वर्ष: ०५ | अंक: २६२ | गुरुवार | किंमत ३/-
संपादक – चंद्रकांत भा. भड
Postal Lic. No. MH/162/202-24 | 91 7350095772

# गल्वान संघर्षानंतर प्रथमच पंतप्रधान मोदी अन चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आमने सामने

## ब्रिक्स परिषदेत द्विपक्षीय चर्चेची शक्यता



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नवी दिल्ली*** – नवी दिल्लीत १२ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेच्या निमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात एक अत्यंत महत्त्वाची द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जून २०२० मध्ये पूर्व लडाखमधील गल्वान खोऱ्यात दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये झालेल्या हिंसक चकमकीनंतर या दोन्ही प्रमुख नेत्यांमध्ये होणारी ही पहिलीच थेट आणि औपचारिक बैठक असेल.

२०२० च्या सीमावादानंतर भारत आणि चीनमधील संबंध कमालीचे ताणले गेले होते. सीमेवरील तणावासोबतच आर्थिक, व्यापारी आणि तांत्रिक पातळीवरील संवादही थांबला होता. या पार्श्वभूमीवर, १२ आणि १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या १८ व्या ब्रिक्स परिषदेसाठी शी जिनपिंग भारतात येत आहेत. गेल्या सात वर्षांतील आणि गल्वान संघर्षानंतरचा हा त्यांचा पहिलाच भारत दौरा आहे. दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्रालयाने अद्याप या बैठकीची अधिकृत घोषणा केलेली नसली, तरीही या संभाव्य बैठकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

यापूर्वी किर्गिस्तानच्या बिश्केक येथे झालेल्या 'एससीओ' परिषदेत दोन्ही नेत्यांची भेट झाली होती, परंतु तिथे फक्त हस्तांदोलन झाले होते; कोणतीही द्विपक्षीय चर्चा झाली नव्हती.

दौऱ्यापूर्वी सुरक्षा आणि राजनैतिक स्तरावर बैठकांचा धडाका 'शी जिनपिंग यांच्या भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमधील राजनैतिक आणि लष्करी संवाद पुन्हा वेगाने सुरू झाला आहे. या बैठकीची पूर्वतयारी म्हणून भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी नुकताच चीनचा दौरा केला आणि तिथल्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

# अबू सालेमला सर्वोच्च न्यायालयाचा दणका

## २५ वर्षांची शिक्षा पूर्ण झाल्याचा दावा फेटाळला





*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – १९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट आणि बांधकाम व्यावसायिक प्रदीप जैन यांच्या हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या गँगस्टर अबू सालेमला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. २५ वर्षांचा कारावास पूर्ण झाल्याच्या आधारावर आपली सुटका करावी, अशी मागणी करणारी सालेमची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

अबू सालेमला २००५ मध्ये पोर्तुगालमधून भारतात आणण्यात आले होते. त्यावेळी भारत सरकारने त्याला २५ वर्षांपेक्षा जास्त काळ कारावासात ठेवले जाणार नाही, असे पोर्तुगाल सरकारला आश्वासन दिल्याचा दावा सालेमने केला होता. त्यानुसार आपली २५ वर्षांची शिक्षा ३१ मार्च २०२५ रोजी पूर्ण झाली असल्याचे त्याचे म्हणणे होते. यामध्ये खटला सुरू असतानाचा कालावधी, शिक्षेनंतरचा तुरुंगवास आणि चांगल्या वर्तणुकीमुळे मिळालेली सूट यांचा समावेश करावा, अशी मागणी त्याने केली होती मात्र, सर्वोच्च न्यायालयाने सालेमचा हा दावा मान्य केलेला नाही.

पोर्तुगालमध्ये पासपोर्टशी संबंधित फसवणूक प्रकरणात त्याने भोगलेल्या शिक्षेचा कालावधी भारतातील २५ वर्षांच्या कारावासाच्या गणनेत धरता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्याच्या सुटकेचा मार्ग सध्या बंद झाला आहे.

यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयातही सालेमने सुटकेसाठी याचिका दाखल केली होती. त्यात सर्वोच्च न्यायालयाच्या २०२२ मधील निर्णयाचा आधार घेण्यात आला होता. या निर्णयात भारत सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार सालेमच्या शिक्षेबाबत केंद्राने योग्य वेळी प्रक्रिया करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

प्रदीप जैन हत्या प्रकरणात जन्मठेपाची शिक्षा अबू सालेम सध्या नाशिक मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहे. मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणासह प्रदीप जैन हत्या प्रकरणात त्याला जन्मठेप सुनावण्यात आली आहे. त्याच्या सुटकेसंदर्भातील मागणीवर केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका तसेच कायदेशीर बाबी यापूर्वी न्यायालयासमोर मांडण्यात आल्या होत्या.

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे सालेमच्या सुटकेच्या मागणीला मोठा धक्का बसला आहे.

## थोडक्यात

### मुंबई विमानतळावरील अनधिकृत मशीद हटवा!

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-२ जवळ उभारण्यात आलेली मशीद अनधिकृत स्पष्ट करीत ती हटविण्याचे निर्देश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) दिले आहेत.

या बांधकामासाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नसल्याचे एमएमआरडीएने विमानतळ प्रशासनाला कळिवल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले. या प्रकरणाची पोलीस चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. विमानतळाच्या व्हीआयपी गेटजवळ ही मशीद उभारण्यात आल्याचा दावा सोमय्या यांनी केला.

# पुण्यात दोन विद्यार्थ्यांची आत्महत्या

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***पुणे*** – एमपीएससी परीक्षेची तयारी करण्यासाठी पुण्यात आलेल्या धाराशिव जिल्ह्यातील २५ वर्षीय तरुणाने राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नारायण पेठ परिसरात घडली. तर कात्रज परिसरातील नॅन्सी लेक होम सोसायटीमध्ये २१ वर्षीय एमबीबीएस विद्यार्थिनीने दहाव्या मजल्यावरून उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी घडल्याने खळबळ उडाली आहे. एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणाचे नाव प्रथमेश दिलीप देशमुख (मूळ रा. खासापुरी, ता. परंडा, जि. धाराशिव) असे आहे. तर एमबीबीएसच्या विद्यार्थिनीचे नाव माया शेखर रेड्डी (वय २१, रा. हैदराबाद) असे असून ती भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, सध्या परीक्षा सुरू असल्याने परीक्षेच्या तणावातून तिने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज तिच्या भावाने पोलिसांकडे व्यक्त केला आहे.

## आर्थिक व्यवहाराबाबत वित्त विभागाचा कठोर पवित्रा

# एसटी महामंडळासमोर १,०७१ कोटींच्या थकबाकीचा डोंगर


*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – राज्य मार्ग परिवहन महामंडळावर (एसटी) चालू महिन्यात तब्बल १,०७१ कोटी रुपयांच्या थकबाकीचा बोजा वाढला आहे. या पार्श्वभूमीवर



एसटी महामंडळाच्या आर्थिक व्यवहारांबाबत राज्याच्या वित्त विभागाने कठोर पवित्रा घेतला आहे. महामंडळाला यापूर्वी देण्यात आलेल्या २०० कोटी रुपयांच्या बिनव्याजी कर्जाची परतफेड अद्याप का झालेली नाही, यासह विविध आर्थिक मुद्द्यांवर वित्त विभागाने सविस्तर अहवाल मागवला असल्याची माहिती महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने दिली. एसटी महामंडळाची गेल्या दोन-तीन वर्षांपासून ४,५०० कोटी रुपयांहून अधिक वैधानिक देणी थकीत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या पीएफ आणि ग्रॅज्युइटीची सुमारे ३,००० कोटी रुपयांची थकबाकी आहे. तसेच, अलीकडे झालेल्या वेतनवाढीच्या फरकापोटीची ४८० कोटी ५३ लाख रुपयांची रक्कम शासनाने मान्य करूनही एसटीला अद्याप मिळालेली नाही, असे संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले.

याशिवाय डिझेल आणि सुट्या भागांपोटीही सुमारे १०० कोटी रुपये देणे बाकी असल्याचे त्यांनी सांगितले.












# विकास प्रकल्पांना गती : 'महाराष्ट्र लँड बँक', 'महाभूमी स्टॅक' प्रणालीचे महसूलमंत्री बावनकुळेंच्या हस्ते लोकार्पण

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्यातील महामार्ग, रेल्वे, बुलेट ट्रेन, विद्युत वाहिन्या यांसारख्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यासाठी



महसूल आणि वन विभागाने संयुक्तपणे तयार केलेल्या जिल्हानिहाय ४० हजार ६०२ हेक्टर 'महाराष्ट्र लँड बँक' आणि 'महाभूमी स्टॅक' या अत्याधुनिक प्रणालींचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते बुधवारी लोकार्पण करण्यात आले. या लँड बँकेमुळे पायाभूत सुविधांचे प्रकल्प वेळेत पूर्ण होणार असल्याचा विश्वास बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच मालमत्तेची निश्चित मालकी नोंद उपलब्ध करून देण्यासाठी आणि जमिनीशी संबंधित वाद कमी करण्यासाठी महाराष्ट्र सरकार डिसेंबरपर्यंत 'लँड टायटलिंग ॲक्ट'(निश्चित मालकीहक्क कायदा) आणणार आहे, अशी माहितीही बावनकुळे यांनी बुधवारी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील अनेक प्रकल्प मार्गी लावण्याच्या उद्देशाने दोन्ही विभागाना समन्वय साधण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आणि जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी 'महाराष्ट्र लँड बँक' व 'महाभूमी स्टॅक' या प्रणालींचे सविस्तर सादरीकरण केले.

### वरुड तालुका सरकारी व निमसरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने

# २० सप्टेंबर रोजी गुणवंतांचा गौरव, सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – वरुड तालुका सरकारी व निमसरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने येत्या २० सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता शहरातील स्व.मारोतराव खेरडे सभागृह येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार व वार्षिक अधिमंडळाच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बियाण महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा महात्मा फुले अर्बन को-ऑप.बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद कोरडे राहतील तर प्रमुख अतिथी व बक्षिस वितरक म्हणुन राज्याचे गृहराज्यमंत्री ना.डॉ.पंकज भोयर राहतील तर प्रमुख अतिथी म्हणुन माजी पं.स.सभापती विक्रम ठाकरे, महात्मा फुले अर्बन को-ऑप.बँकेचे संचालक राजेंद्र आंडे, दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी सभासदांचे पाल्यांचा गौरव करण्यात येणार असून त्यामध्ये वर्ग ४ मधुन यीक्षित पंकज चाफले, श्लोक शशिकांत काळे, पार्थ सतिश गिरी, वर्ग ७ मधुन कर्तव्या राजेंद्र अवथळे, अरुष बाबाराव साळुंके, तनवी विजय पोकळे, अदीबा मिर्झा शहजाद अख्तर, वर्ग १० मधुन वेदांत नरेंद्र फरकसे, गुंजन प्रशांत हरणे, हार्दिक अजय बरडे, गार्गी विवेक वझरकर, रेवा प्रविण कराळे, श्रृतिका निलेश दुधे, वर्ग १२ मधुन शुभदा मधुसूदन वाघमारे, आनंदी मनिष देशमुख, श्रावणी सुनिल जाने, कौस्तुभ सुनिल वाडीकर, आर्या नेताजी पाटील यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात येणार आहे.

त्यानंतर दुपारी ३.३० संस्थेची बेचाळीसावी वार्षिक अधिमंडळाची सभा घेण्यात येणार असून या सभेमध्ये मागील १४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या वाषिक अधिमंडळाचे सभेचे वृत्तांत वाचन करणे, संस्थेच्या व्यवहारासंबंधीचा संचालक मंडळाचा सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल, संचालक मंडळाने तयार केलेले नफा-तोटा पत्रक आणि ताळेबंद पत्रकास मंजुरात देणे, नफ़याचे विनियोजनस मान्यता देणे, सन २०२५-२६ या आर्थीक वर्षांकरीता अंदाजपत्रकास मंजुर करणे व सन २०२५-२६ सालाच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरात देणे, सन २०२५-२६ या वर्षाचे अंकेक्षण अहवालाची नोंद घेणे व संचालक मंडळाने सुचविलेला दोष दुरुस्ती स्विकारणे, सन २०२६-२७ साठी अंकेक्षकाची नियुक्ती करणे, बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादी निश्चित करणे, अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करुन मान्यता देण्यात येणार आहे. या संपुर्ण कार्यक्रमाला वरुड तालुका सरकारी व निमसरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विलास टाकरखेडे, उपाध्यक्ष राजेश ठाकरे, मानद सचिव आशिष पावडे, खजिनदार महेश्वर पवार, संचालक जगदीश वानखडे, गजानन देशमुख, मनोहर गणोरकर, संदीप बोबडे, किशोर वैराळे, मो.नईम, राजकुमार पुनसे, विलास दुपारे, संचालिका मंगला वासनकर, वनिता कडू, आशा अनिल चहांदे, स्विकृत संचालक दिनेश उंबरकर, सुरेंद्र वसुले, तज्ञ संचालक संजय ठाकरे, विजय तिवसकर आदी उपस्थित राहणार आहेत.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार व वार्षिक अधिमंडळाच्या सभेला सभासदांनी उपस्थित राह-वे, असे आवाहन मुख्य व्यवस्थापक विजय कडू यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

### नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये

# श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्साहात



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – येथील नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जयंतीनिमित्त दहीहंडी फोडून जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण आणि राधा यांची आकर्षक वेशभूषा परिधान केली होती. यावेळी शाळेत गायन व नृत्याचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थिनींनी राधा-कृष्णाच्या वेशात बहारदार नृत्य सादर केले तर विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण भक्तिगीते सादर करुन वातावरण भक्तिमय केले. दहीहंडी फोडताना मुलांचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

कार्यक्रमाचे संचालन गीतेश्वरी कापसे यांनी केले. कार्यक्रमाला पाहुणे म्हणुन पूजा लोकेश अग्रवाल, विशाखा तिवारी, शुभांगी कापडे व लोकेश अग्रवाल उपस्थित होते. प्राचार्य विनोद भोंगाडे यांनी श्रीकृष्ण जयंतीचे महत्त्व विषद केले. यावेळी त्यांनी कृष्ण भक्तिगीत सादर करुन विद्यार्थ्यांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# शांतिनिकेतन शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त गोपालकाला उत्साहात साजरा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – येथील शांतिनिकेतन शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त गोपालकाला कार्यक्रम उत्साहपूर्ण व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. राधा कृष्णाच्या आकर्षक भूमिकेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उपस्थित यांचे लक्ष वेधून घेतले तर दहीहंडी फोडण्याच्या थरारक सोहळ्याने कार्यक्रमाला विशेष सांगत आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख होत्या. त्यांचे



स्वागत पर्जन्या गाडबैल, प्रमुख पाहुणे गणेश असलकर यांचे स्वागत दिया असलकर हिने केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते गोपालकृष्णाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नर्सरी ते इयत्ता चौथी पर्यंतचे विद्यार्थी राधाकृष्ण तसेच कृष्णाच्या सवंगडयांच्या मनमोहक वेषभुषेत सहभागी झाले होते. त्यांच्या निरागस रुपाने संपूर्ण शाळेचे वातावरण कृष्णमय झाले होते. शाळेच्या प्रांगणात इयत्ता ९ वी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी भव्य मानवी पिरॅमिड तयार करून दहीहंडी फोडली. दहीहंडी फोडतांना विद्यार्थ्यांनी केलेल्या जल्लोषाने परिसर दुमदुमून गेला होता. त्यानंतर वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांनी कृष्णलिलेवर आधारित सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना गोपालकाला वाटण्यात आला. कार्यक्रमाच्या संचालन सुहानी पोलाद व देवयानी बोरकर तर आभार माही असलकर हिने मानले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक विनोद ठवळी यांच्या मार्गदर्शन लाभले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम उत्साहात व यशस्विरित्या पार पडला.

# अणुवीज प्रकल्पात ७९ हजार कोटींची गुंतवणूक

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – वीजनिर्मिती क्षेत्रातील टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड या दोन कंपन्या राज्यात अणुवीज निर्मितीचा प्रकल्प उभारण्याच्या तयारीत आहेत. या दोन्ही कंपन्यांकडून ४ हजार २०० मेगावॅट क्षमतेचे अणुऊर्जा प्रकल्प उभारले जाणार आहेत. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी ७९ हजार कोटींच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार करण्यात आला. राज्याची स्वच्छ



ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरात राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. अणुऊर्जा हा सक्षम आणि महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे आला आहे. या नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीमुळे अणुऊर्जेच्या निर्मिती क्षमतेत मोठी वाढ शक्य होईल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

अणुऊर्जा क्षेत्रात नव्या संधी देशात विकसित करण्यात आलेल्या स्वदेशी अणुभट्ट्या तसेच थोरियम आधारित तंत्रज्ञानाच्या चाचण्यांमुळे अणुऊर्जा क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. हे क्षेत्र उदयोन्मुख असून या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांच्या प्रवासात राज्य सरकार सहप्रवासी म्हणून पूर्ण सहकार्य करेल.

# न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे डॉ.राधाकृष्ण सर्वपल्ली यांचा जन्मदिन 'शिक्षक दिन' उत्साहात

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणुन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.





सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ.राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी भार्गवी पंडागळे व माहेश्वरी बांबल या विद्यार्थिनींनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील मोलाच्या योगदानाबद्दल विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शाळेत आयोजित केलेले स्वयंशासित विद्यालय, ज्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहभागी विद्यार्थ्यांनी शालेय प्रशासनाची जबाबदारी नियोजन पूर्व व शिस्तबद्धपणे पार पाडली प्राचार्या, उपप्राचार्य, समन्वयक, व्यवस्थापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वच भूमिका उस्फूर्तपणे वठविल्यात. शिक्षकांची वेशभूषा परिधान केलेल्या भावी शिक्षकांनी आपल्या अध्यापन कौशल्यातून विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतले. शाळेचे प्राचार्य म्हणुन रुद्रेश अजय गुल्हाने, उपप्राचार्य जानवी प्रवीण उपासे, समन्वयक अनुष्का राजेंद्र गावंडे, पर्यवेक्षक दीप नरेंद्र काळे तर प्रशासक आदित्य हितेंद्र लोणारे यांनी आपली पदे सांभाळून शाळेचा संपूर्ण कारभार अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने व जबाबदारीने पार पाडला .विद्यार्थ्यांनी वर्गात जाऊन लहान विद्यार्थ्यांना शिकवण्याचे आणि वर्ग नियंत्रण ठेवण्याचे काम अगदी चोख बजावले. दिवसभर चाललेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांची आणि त्यांच्या कष्टांची जाणीव झाली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांना शुभेच्छापत्र आणि फुले देऊन त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मुख्याध्यापक व शिक्षक वृंदाने विद्यार्थ्यांच्या या सुंदर नियोजनाचे तोंड भरून कौतुक केले व हा शिक्षक दिन सर्वांसाठी अविस्मरणीय ठरल्याचे सांगितले .

शिक्षक दिनाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांना प्राचार्य माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, विभाग प्रमुख किशोर देशमुख व पराग भोंडे यांच्या हस्ते भेटवस्तू वितरित करून शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

शिक्षक दिनानिमित्त शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव श्याम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर या सर्व मान्यवरांनी शिक्षकांना शुभेच्छा दिल्यात.

## संपादकीय

**प्रेम इतरांसाठी : आपल्या मनामध्ये इतरांबद्दल आदर, प्रेमभाव असला पाहिजे.**

### आकड्यांच्या आभासात अडकलेली अर्थव्यवस्था

जीडीपी वाढ म्हणजेच सर्वांगीण विकास नव्हे देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती मोजण्यासाठी सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी हा महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो. प्रत्येक तिमाहीला प्रसिद्ध होणाऱ्या जीडीपीच्या आकडेवारीकडे सरकार, उद्योगजगत, गुंतवणूकदार आणि सामान्य नागरिक यांचे लक्ष लागलेले असते. अलीकडील अधिकृत अंदाजानुसार भारतीय अर्थव्यवस्थेने अपेक्षेपेक्षा चांगली वाढ नोंदविल्याचे चित्र समोर आले आहे. मात्र या आकडेवारीच्या आधारे देशातील सर्व आर्थिक समस्या संपल्या किंवा सर्वसामान्यांच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. उलट, केवळ जीडीपीच्या वाढीचा आधार घेऊन व्यापक आर्थिक वास्तवाकडे दुर्लक्ष करणारी भाष्ये अधिक दिशाभूल करणारी ठरू शकतात. जीडीपी म्हणजे एका ठराविक कालावधीत देशात निर्माण झालेल्या वस्तू आणि सेवांचे एकूण आर्थिक मूल्य. हा निर्देशांक उत्पादनाची गती दर्शवितो; पण समाजातील संपत्तीचे वितरण, रोजगाराची गुणवत्ता, उत्पन्नातील विषमता किंवा ग्रामीण अर्थव्यवस्थेची स्थिती यांचे संपूर्ण चित्र तो दाखवत नाही. म्हणूनच जीडीपीची वाढ आणि लोकांच्या प्रत्यक्ष जीवनातील सुधारणा या दोन गोष्टी नेहमीच समानार्थी नसतात. अधिकृत आकडेवारीनुसार सेवा क्षेत्र, बांधकाम आणि काही उद्योगांनी चांगली कामगिरी केली असली, तरी त्याच वेळी शेतीसमोरील संकट, लघुउद्योगांची अडचण, बेरोजगारी आणि महागाई यांसारख्या समस्या कायम आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्था तेजीत आहे असा एकरेषीय निष्कर्ष वास्तवाचे पूर्ण प्रतिनिधित्व करत नाही. भारतासारख्या देशात शेतीवर अवलंबून असलेली मोठी लोकसंख्या अजूनही हवामान, उत्पादनखर्च आणि बाजारभाव यांच्या कचाट्यात सापडलेली आहे. अनेक राज्यांमध्ये दुष्काळ, अवकाळी पाऊस किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान वाढले आहे. जीडीपीच्या वाढीच्या टक्केवारीत या वेदनांचे प्रतिबिंब फारसे दिसून येत नाही. याचबरोबर रोजगाराच्या प्रश्नाकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अर्थव्यवस्था वाढत असली तरी त्या वाढीमुळे पुरेशा प्रमाणात गुणवत्तापूर्ण रोजगार निर्माण होत आहेत का, हा मूलभूत प्रश्न आहे. अनेक तरुण उच्चशिक्षित असूनही योग्य रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची स्थिती अजूनही अस्थिर आहे. अशा परिस्थितीत केवळ जीडीपीच्या वाढीचा दाखला देऊन रोजगाराची समस्या कमी लेखणे उचित ठरणार नाही. महागाईचाही विचार तितकाच आवश्यक आहे. सामान्य कुटुंबासाठी अन्नधान्य, भाजीपाला, इंधन, आरोग्य आणि शिक्षणावरील खर्च सातत्याने वाढत असेल, तर कागदावरील आर्थिक वाढ त्यांच्यासाठी फारसा दिलासा देत नाही. आकडे सकारात्मक असले तरी नागरिकांच्या खिशावर पडणारा भार कमी झालेला नाही. जीडीपीच्या आकडेवारीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ती सतत सुधारित होत असते. प्रारंभिक अंदाजानंतर पुढील काही महिन्यांत आकडे बदलू शकतात. त्यामुळे एका प्राथमिक अंदाजाच्या आधारावर अतिशयोक्तीपूर्ण राजकीय किंवा आर्थिक दावे करणे टाळले पाहिजे. जबाबदार सार्वजनिक चर्चेसाठी आकडेवारीचे सखोल विश्लेषण आवश्यक असते. अर्थतज्ज्ञ वारंवार सांगतात की, आर्थिक प्रगतीचे मूल्यांकन करताना अनेक निर्देशांकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. रोजगारदर, महागाई, औद्योगिक उत्पादन, कृषी उत्पन्न, निर्यात, गुंतवणूक, ग्राहकांचा आत्मविश्वास आणि मानवी विकास निर्देशांक या सर्व बाबींचे संतुलित विश्लेषण झाल्यासच अर्थव्यवस्थेचे वास्तव स्पष्ट होते. माध्यमांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. केवळ ङ्गवाढ झालीङ्ग किंवा ङ्गघसरण झालीङ्ग अशा मथळ्यांपलीकडे जाऊन त्या वाढीचा लाभ कोणाला झाला, कोण मागे राहिले आणि कोणत्या क्षेत्रात सुधारणा आवश्यक आहे, हे समाजासमोर मांडणे ही माध्यमांची जबाबदारी आहे. आकड्यांचा संदर्भ न देता त्यांचा प्रचार करणे ही माहितीपेक्षा भ्रम निर्माण करण्याची प्रक्रिया ठरू शकते. सरकारसाठीही हा योग्य आत्मपरीक्षणाचा काळ आहे. आर्थिक वाढ टिकवून ठेवण्यासाठी पायाभूत सुविधा, उत्पादनक्षमता, कौशल्यविकास आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्याच वेळी शेतकरी, लघुउद्योग, असंघटित क्षेत्रातील कामगार आणि मध्यमवर्ग यांच्या अडचणी दूर करण्यासाठी लक्ष्यित धोरणे राबविणे तितकेच महत्त्वाचे आहे. आर्थिक यशाचा खरा अर्थ तेव्हाच सिद्ध होतो, जेव्हा विकासाचा लाभ समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचतो. केवळ उच्च वाढीचे आकडे पुरेसे नाहीत; त्या वाढीमुळे नागरिकांचे उत्पन्न वाढले, रोजगार निर्माण झाले, शिक्षण आणि आरोग्य अधिक सुलभ झाले आणि ग्रामीण-शहरी दरी कमी झाली, तरच ती प्रगती अर्थपूर्ण ठरेल.


# जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन

एक संवादः एक आधारः एक आशा जीवन वाचवू शकते!

१० सप्टेंबर आत्महत्या प्रतिबंधासाठी जनजागृतीचा दिवस

मला आता जगायचे नाहीः

एखादी व्यक्ती हे वाक्य बोलते तेव्हा आपण अनेकदा त्याकडे दुर्लक्ष करतो. कधी त्याला भावनिक कमजोरी समजतो, कधी लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न म्हणतो, तर कधी सगळ्यांच्या आयुष्यात समस्या असतात असे म्हणून विषय बदलतो. पण कदाचित त्या काही शब्दांच्या मागे एक मोठी वेदना, असहायता आणि मदतीची आर्त हाक दडलेली असू शकते.




म्हणूनच जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आपल्याला एक अत्यंत महत्त्वाचा संदेश देतोआत्महत्येबद्दल शांत राहण्याऐवजी संवाद साधा, संकटात असलेल्या व्यक्तीला एकटे पडू देऊ नका आणि योग्य वेळी मदत मिळवून द्या. दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात आत्महत्या प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी पाळला जातो. या दिवसाचा उद्देश आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला सहभागी करून घेणे, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे, मदत मागण्यावरील कलंक कमी करणे आणि संकटात असलेल्या व्यक्तींना आधार देणे हा आहे.

आत्महत्या हा अचानक घेतलेला निर्णयच असतो का? आत्महत्येमागे एकच कारण असते असे नाही. अनेकदा व्यक्तीच्या आयुष्यातील अनेक समस्या, मानसिक ताण आणि भावनिक संघर्ष एकत्र येतात. नैराश्य, तीव्र चिंता, एकटेपणा, नातेसंबंधातील तणाव, कौटुंबिक संघर्ष, आर्थिक अडचणी, बेरोजगारी, शैक्षणिक अपयश, करिअरविषयक दबाव, सामाजिक अपमान, छळ, व्यसनाधीनता, गंभीर आजार, प्रिय व्यक्तीचे निधन किंवा आयुष्यातील अचानक आलेले मोठे संकट यामुळे व्यक्तीला परिस्थिती असह्य वाटू शकते.

काही वेळा बाहेरून पाहता व्यक्तीचे जीवन अगदी व्यवस्थित दिसत असते. ती नोकरी करत असते, व्यवसाय करत असते, मित्रांमध्ये मिसळत असते किंवा सोशल मीडियावर आनंदी फोटो पोस्ट करत असते. पण तिच्या मनात मात्र प्रचंड संघर्ष सुरू असू शकतो.म्हणूनच मानसिक वेदना नेहमी चेहऱ्यावर दिसतातच असे नाही.

मी एकटा/एकटी आहे ही भावना किती धोकादायक ठरू शकते? मानवाला भावनिक आधाराची गरज असते. संकटाच्या काळात माझे कोणीतरी ऐकणारे आहे ही भावना व्यक्तीला मोठी ताकद देते.याउलट, माझे कोणीच नाही, मला कोणी समजून घेत नाही, ङ्गमी इतरांसाठी ओझे आहे अशा भावना वाढत गेल्या तर व्यक्ती स्वतःला समाजापासून दूर करू शकते. याठिकाणी कुटुंब, मित्र, शिक्षक, सहकारी आणि समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

कधी कधी मोठमोठे उपाय करण्याची गरज नसते.फक्त ऐकून घेणेही मदत ठरू शकते. एक फोनः एक मेसेजः एक कप चहा घेऊन केलेली भेटः तू ठीक आहेस ना? असा मनापासून विचारलेला प्रश्नः आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तू काहीही सांग, मी तुझं ऐकणार आहे. हे शब्द एखाद्या व्यक्तीसाठी आशेची सुरुवात ठरू शकतात.

आत्महत्येबद्दल बोलणे का आवश्यक आहे? आपल्या समाजात मानसिक आरोग्याबद्दल अजूनही अनेक गैरसमज आहेत. मानसिक त्रासाबद्दल बोलणाऱ्या व्यक्तीला कमजोर, नाटक करणारी, लक्ष वेधून घेणारी किंवा मनाने कमकुवत असे लेबल लावले जाते.

यामुळे अनेक व्यक्ती मदत मागतच नाहीत. आपण हे बदलले पाहिजे. मानसिक त्रास हा कमजोरीचा पुरावा नाही. ज्याप्रमाणे ताप आला तर डॉक्टरांकडे जातो, त्याचप्रमाणे मनावर मोठा ताण असेल तर मानसिक आरोग्य व्यावसायिकांची मदत घेणे ही देखील जबाबदारीची गोष्ट आहे. आत्महत्येबद्दल संवेदनशीलपणे आणि सुरक्षित पद्धतीने संवाद साधणे व्यक्तीला मदतीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग देऊ शकते.

कोणते बदल गांभीर्याने घ्यावेत? आपल्या जवळची व्यक्ती अचानक खूप बदलली असेल तर त्या बदलांकडे दुर्लक्ष करू नये. उदाहरणार्थ: सतत निराश, उदास किंवा असहाय दिसणे, मित्र आणि कुटुंबापासून दूर राहणे, दैनंदिन कामांमध्ये रस कमी होणे, झोप किंवा खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये मोठे बदल होणे, सतत अपराधीपणा किंवा निरर्थकतेची भावना व्यक्त करणे, माझ्यामुळे सगळ्यांना त्रास होतो असे म्हणणे, भविष्यासंबंधी पूर्ण निराशा व्यक्त करणे, मृत्यू किंवा स्वतःला इजा करण्याबद्दल बोलणे, अचानक सर्वांपासून दूर होणे किंवा असामान्य भावनिक बदल दिसणे यापैकी एखादे चिन्ह दिसले म्हणून व्यक्ती आत्महत्या करेलच असे नाही. पण अशा वेळी संवेदनशीलपणे विचारपूस करणे आणि गरज असल्यास व्यावसायिक मदत घेणे योग्य आहे.

काय बोलावे आणि काय टाळावे? संकटात असलेल्या व्यक्तीशी बोलताना आपला दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा असतो. असे बोलू शकता: मी तुझ्यासोबत आहे. तुला जे वाटत आहे ते मला सांग. तुला हे एकट्याने सहन करण्याची गरज नाही. आपण मिळून मदत घेऊया. तुझ्या आयुष्याला आणि तुझ्या भावनांना महत्त्व आहे. असे बोलणे टाळा: तुला एवढे काय झाले? हे सगळे फक्त तुझ्या मनात आहे. इतरांचे प्रश्न बघ, त्यांच्यापेक्षा तुझे काहीच नाही.तू असे काही करणार नाहीस.लोक काय म्हणतील याचा विचार कर. उद्देश व्यक्तीला गप्प करणे नसून तिला बोलण्यासाठी सुरक्षित जागा देणे हा असावा.

कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आजच्या धावपळीच्या जीवनात कुटुंबातील सदस्य एकाच घरात राहूनही भावनिकदृष्ट्या दूर होत आहेत. पालकांना मुलांच्या गुणांची, करिअरची आणि भविष्यातील यशाची चिंता असते; पण त्याचबरोबर त्यांच्या भावनांचीही चौकशी करणे गरजेचे आहे. मुलाने परीक्षेत कमी गुण मिळवले तर त्याला अपयशी म्हणण्याऐवजी या निकालामुळे तुला कसे वाटत आहे? असा प्रश्न विचारणे अधिक महत्त्वाचे आहे.

मुलाला हे जाणवले पाहिजे की माझे गुण कमी झाले तरी माझे आई-वडील माझ्यासोबत आहेत. ही भावना मानसिक आरोग्यासाठी मोठा आधार ठरू शकते.

विद्यार्थ्यांवरील वाढता मानसिक दबाव आज विद्यार्थी अनेक प्रकारच्या दबावाला सामोरे जात आहेत. परीक्षा, स्पर्धा, करिअर, पालकांच्या अपेक्षा, मित्रांशी तुलना, सोशल मीडिया, शरीराविषयीच्या अपेक्षा, नातेसंबंध आणि भविष्याची चिंता यामुळे अनेक तरुण मानसिक तणाव अनुभवतात. एक परीक्षा म्हणजे संपूर्ण आयुष्याचा निकाल नाही. एक अपयश म्हणजे व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व अपयशी नाही. विद्यार्थ्यांना हे समजावून सांगण्याची गरज आहे की आयुष्यात यश मिळिवण्याचे अनेक मार्ग असतात.

कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य नोकरीतील ताण, कामाचा वाढता भार, असुरक्षितता, आर्थिक चिंता, वरिष्ठांचा दबाव, काम-जीवनातील असमतोल आणि सततची स्पर्धा यामुळे प्रौढांमध्येही मानसिक ताण वाढू शकतो. कार्यालयात मानसिक आरोग्याबद्दल बोलण्यास सुरक्षित वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्याला फक्त काम पूर्ण कर असे सांगण्याऐवजी तुला काही मदतीची गरज आहे का? हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

सोशल मीडिया आणि मानसिक आरोग्य सोशल मीडिया आपल्या जीवनाचा महत्त्वाचा भाग झाला आहे. परंतु सतत इतरांशी तुलना केल्यामुळे काही व्यक्तींमध्ये न्यूनगंड, असमाधान आणि एकटेपणा वाढू शकतो. सोशल मीडियावर दिसणारे आयुष्य हे संपूर्ण वास्तव नसते. इतरांच्या परफेक्ट दिसणाऱ्या जीवनाशी स्वतःची तुलना करून स्वतःला कमी लेखणे टाळले पाहिजे. आपल्या आयुष्याची किंमत लाइक्स, कमेंट्स किंवा फॉलोअर्सवर ठरत नाही.

आत्महत्येबाबतचे गैरसमज दूर करूया समाजातील चुकीच्या समजुती आत्महत्या प्रतिबंधाच्या मार्गातील मोठा अडथळा आहेत. आत्महत्येबद्दल बोलणाऱ्या व्यक्तीला गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. ती फक्त लक्ष वेधून घेत आहे असे समजणे धोकादायक ठरू शकते. त्याचप्रमाणे मानसिक आजार म्हणजे वेडेपणा नाही आणि मानसशास्त्रज्ञ किंवा मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेणे लाजिरवाणे नाही. मदत मागणे म्हणजे कमजोरी नव्हे; स्वतःच्या आयुष्याला महत्त्व देण्याचे धैर्य आहे.

व्यावसायिक मदत घेण्याचे महत्त्व काही मानसिक समस्या केवळ मित्रांशी बोलून किंवा स्वतःहून प्रयत्न करून पूर्णपणे सुटतीलच असे नाही. दीर्घकाळ नैराश्य, तीव्र चिंता, आत्महत्येचे विचार किंवा स्वतःला इजा करण्याचा धोका जाणवत असल्यास मानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ किंवा योग्य मानसिक आरोग्य व्यावसायिकांची मदत घेणे आवश्यक आहे. उपचार आणि समुपदेशनामुळे व्यक्तीला स्वतःच्या भावना समजून घेणे, संकटाचा सामना करणे, नकारात्मक विचारांवर काम करणे आणि भविष्यासाठी सकारात्मक मार्ग शोधणे शक्य होते.

संकटाच्या क्षणी काय करावे? जर एखादी व्यक्ती स्वतःला इजा करण्याचा किंवा आत्महत्येचा तातडीचा धोका व्यक्त करत असेल तर तिची सुरक्षितता सर्वात प्रथम महत्त्वाची आहे. तिला एकटे सोडू नका. विश्वासू कुटुंबीय किंवा मित्राला त्वरित सहभागी करा. शक्य असल्यास धोकादायक वस्तू किंवा साधनांपासून व्यक्तीला दूर ठेवा. जवळच्या रुग्णालयात किंवा स्थानिक आपत्कालीन वैद्यकीय सेवेशी तातडीने संपर्क साधा. भारतामध्ये मानसिक आरोग्य सहाय्यासाठी १४४१६ या सेवेशी संपर्क साधता येतो.

आत्महत्या प्रतिबंध म्हणजे फक्त मृत्यू रोखणे नाही आत्महत्या प्रतिबंधाचा अर्थ फक्त आत्महत्येपासून एखाद्याला थांबवणे एवढाच नाही. याचा अर्थ आशा निर्माण करणे.मानसिक आरोग्याची काळजी घेणे. समाजातील कलंक कमी करणे. एकटेपणा कमी करणे. मदत मागणे सोपे करणे. प्रत्येक व्यक्तीला तू महत्त्वाचा/महत्त्वाची आहेस हे जाणवून देणे.

आपण असा समाज निर्माण केला पाहिजे जिथे एखाद्या व्यक्तीला संकट आले तर तिला लपवावे लागणार नाही, तर ती निर्भयपणे म्हणू शकेल मला मदतीची गरज आहे. आणि समाज तिचे उत्तर देईल हो, आम्ही तुझ्यासोबत आहोत.

जीवनात संकट येतात; पण संकट म्हणजे शेवट नाही आयुष्यात प्रत्येक व्यक्तीला कठीण काळाचा सामना करावा लागतो. कधी अपयश येते. कधी नाती तुटतात. कधी आर्थिक संकट येते. कधी आपली माणसे दूर जातात. कधी आपण स्वतःवरच नाराज होतो. पण कोणतीही कठीण परिस्थिती कायमस्वरूपी नसते. आज अंधार आहे म्हणजे उद्या सूर्य उगवणार नाही असे नाही. कधीकधी आपल्याला फक्त त्या कठीण रात्रीत कोणीतरी आपल्या सोबत उभे राहण्याची गरज असते.

चला, आशेची साखळी निर्माण करूया या जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त आपण एक संकल्प करूया मी माझ्या आजूबाजूच्या व्यक्तींच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देईन. कोणी दुःखी असेल तर त्याची चेष्टा करणार नाही. कोणी मदत मागितली तर त्याला दोष देणार नाही. मानसिक आजाराबद्दल गैरसमज पसरवणार नाही. गरज पडल्यास व्यावसायिक मदतीकडे मार्गदर्शन करीन. आणि सर्वात महत्त्वाचे एखादी व्यक्ती शांत आहे म्हणून ती ठीक आहे असे गृहीत धरणार नाही. अंतिम संदेश एक संवाद कदाचित एक जीव वाचवू शकतो. म्हणून आज आपल्या आसपासच्या एखाद्या व्यक्तीला फोन करा. विचारा तू खरंच ठीक आहेस ना? आणि तिचे उत्तर ऐकण्यासाठी काही क्षण थांबा. कदाचित तिला सल्ल्याची गरज नसेल. कदाचित तिला फक्त कोणीतरी ऐकणारे हवे असेल. ऐका. समजा. साथ द्या. मदत मिळवून द्या. कारण प्रत्येक जीवन मौल्यवान आहे. प्रत्येक वेदनेला ऐकणारा कान हवा. प्रत्येक अंधारानंतर आशेचा प्रकाश असतो. आत्महत्या प्रतिबंधात आपण सर्वजण भूमिका बजावू शकतो.

चला, आत्महत्येबद्दलची शांतता तोडूयाः मानसिक आरोग्याबद्दल संवाद वाढवूयाः आणि प्रत्येक जीवनासाठी आशेचा हात पुढे करूया. जीवन संपवण्याचा विचार येतो तेव्हा, जीवन बदलण्याची संधी देऊया.



**डॉ. शिवा माया पुंडकर**
**मनोविकास तज्ञ,संमोहन तज्ञ, पुरस्कार प्राप्त समुपदेशक व प्रशिक्षक. अमरावती (वरुड )**
**७३७८८६६५५५**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# कमी पावसाळा झाल्याने प्रसिध्द पोळ्याच्या बाजारावर आर्थिक टंचाईचे सावट : व्यावसायिक चिंतेत



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – विदर्भात सर्व दूर ओळख असलेला शेंदुरजनाघाटचा पोळा बाजारात दरवर्षी यावर्षी सुद्धा असणार आहे. या बाजारात करोडो रुपयांची उलाढाल होत असल्याने विविध जिल्ह्यातील व्यवसायीकांना येथे आपला तयार केलेल्या विविध वस्तु विक्रीसाठी आणतात, यामुळे व्यवसायिकांनी आणलेल्या वस्तूची विक्री करुन दोन दिवसाला मोठ्या प्रमाणात त्यांना त्यांचा मोबदला मिळतो परंतु या बाजारावर यावर्षी कमी पावसामुळे मजुरांना मजुरी व शेतीचे उत्पन्नाची आस कमी झाल्याने वस्तु खरीददार वर्गाकडे पैशाची चणचण जाणवत असल्याने यावेळचा बाजारावर मंदीचे सावट सध्या तरी राहणार असल्याचे दिसत आहे.



दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा पोळ्याच्या दोन दिवसा अगोदरपासून बाजारपेठ सजायला सुरुवात होते. येथील दोन दिवसीय प्रसिद्ध असलेली पोळ्याची बाजारपेठ ९ व १० सप्टेंबर रोजी भरत आहे. या बाजारात दरवर्षी महिला, पुरूष मंडळी, युवा वर्ग, लहान मुले पंचक्रोशीतील नागरिकांची विविध वस्तूंच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी उसळते. मागील दोन वर्षांपासून लाडकी बहीण योजनेचा पैसा महिलांजवळ आल्याने या लाडक्या बहिणींनी खरेदीसाठी प्रचंड गर्दी केल्याचे दिसून आले होते. परंतु यावर्षी शासनाने बऱ्याच लाडक्या बहिणींना अपात्र ठरविल्याने व ऐन पावसाळ्याच्या दिवसात पावसाने दांडी मारल्याने पोळ्याच्या बाजारावर मंदीचे सावट दिसु लागले आहे.

हा बाजार नागरिकांना सहजरीत्या विविध गोष्टी उपलब्ध करून देणारा बाजार म्हणुन नावारुपास असल्याने दरवर्षी पंचक्रोशीतील नागरिकांची या बाजारात मांदियाळी पाहायला मिळते. त्यामुळे दरवर्षी कोटीच्या घरात उलाढाल या बाजारात होत असते. नागपूर, अमरावती, वर्धा व मध्यप्रदेशमधील विविध राज्यांतील व्यापारी या बाजारात आपली प्रतिष्ठाने सजवून व्यापार करतात. या बाजारात शेती उपयोगी साहित्य, लोखंडी अवजारे, घरगुती साहित्य, खेळणी, लाकडी वस्तू व फर्निचर, फायबर वस्तू व फर्निचर, मातीचे लहान मोठे बैल घरगुती शोभेच्या वस्तू, रोपवाटिकेतील विविध शोभेच्या फुलझाडे, फळांची झाडांची रोपे, महिलांना लागणाऱ्या गृहपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांसह विविध वस्तू सहजतेने उपलब्ध होतात व वाजवी भावात मिळत असल्याने महिलांची सुद्धा मोठ्या संख्येने गर्दी या बाजारपेठेत दोन दिवस पाहायला मिळते.

प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टीने आखणी या बाजारासाठी नगरपरिषद कार्यालय येथे संबंधित सर्व संबंधित सर्व अधिकारी व नगराध्यक्ष नगरसेवक, व नगरसेविका व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत एक बैठक बोलावुन नियोजन करुन न.प.प्रशासन, पोलिस प्रशासन, महावितरण विभाग सज्ज झाल्याचे दिसून येत आहे. या तिन्ही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी बाजाराच्या जागेची संयुक्त पहाणी केली आहे. न.प.प्रशासनाकडून दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्व बाजारपेठेत सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात येणार आहे. सर्व बाजारपेठेत रोशनाई करण्यासाठी इलेक्ट्रिक खांबावर अतिरिक्त दिवे बसविण्यात येणार असल्याचे महावितरण विभागाने सांगितले आहे. पोलिस प्रशासन सज्ज महिला सुरक्षेच्या दृष्टीने स्थानिक पोलिस प्रशासनाकडून पोळा बाजारात तगडा बंदोबस्त राहणार आहे. दरवर्षीप्रमाणे मध्यबाजारात पोलिस चौकी उभारण्यात येणार आहे. बाजारात येणाऱ्या रस्त्यांवर बॅरेगेट उभारण्यात आले आहे.

त्यामुळे जड वाहनांसह दुचाकी चालकांकरिता दोन दिवसांकरिता बाजारात प्रवेशबंदी असेल, त्यामुळे लहान व मोठ्या व्यापाऱ्यांनी आपले साहित्य वेळीच बाजारात आणावे असे ठाणेदार राहुल गवई यांनी कळविले आहे.

---

### नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.२ येथे

# शिक्षक दिन व दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.२ येथे शिक्षक दिन आणि दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात एकत्रितपणे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी भाषणे, कविता व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन शिक्षकांचा गौरव केला. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त राधा–कृष्ण वेशभूषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राधा–कृष्ण कॉन्व्हेंट शाळेतील तसेच नगर परिषद प्राथमिक शाळा क्र. २ मधील इयत्ता पहिली व दुसरीचे विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी राधा व श्रीकृष्ण यांच्या आकर्षक वेशभूषेत सहभाग घेऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. त्यानंतर दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत गोविंदांच्या वेशभूषेत मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गजानन कपले, स्नेहल वघाळे, लक्ष्मीकांत तायडे, प्रणिता चापले, नितु परतेती, रंजना परतेती, लोकेश कटारे, प्रिती रगडे, भैरवी नवरंग, नाजीमशाह, नम्रता खतरकर, सीमा दवंडे, प्रविण कुमरे आणि रंजना पारसे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका कीर्तिमाला धुर्वे यांनी मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली तसेच सहाय्यक शिक्षक गायकवाड, हेमंत धानोरकर, विजयकुमार इंगळे, रीना पुरी खोब्रागडे, दुपारे, सुपले, शिक्षकेत्तर कर्मचारी सुरेश माळोदे यांनी मोलाचे योगदान दिले.

---

## सीजेपी आंदोलकाला नोटीस : सरन्यायाधीशांनी दंडाधिकाऱ्यांना फटकारले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – जंतर–मंतर येथे 'सीजेपी'च्या आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्याला नोटीस बजावल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी ग्रेटर नोएडाच्या कार्यकारी न्यायदंडाधिकाऱ्यांना चांगलेच खडेबोल सुनावले.

सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशानंतरही अशी नोटीस बजावण्याची हिंमत न्यायदंडाधिकाऱ्यांना होतेच कशी, असा थेट सवाल उपस्थित करत या प्रकरणी संबंधित दंडाधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागणार असल्याचे स्पष्ट केले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर वरिष्ठ वकील विश्वजीत भट्टाचार्य यांनी हे प्रकरण उपस्थित केले.

---

### नगरपरिषद शाळा क्र.४ शेंदुरजनाघाट येथे

# जन्माष्टमी आणि गोपाळकाल्याचे औचित्य साधून

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – नगरपरिषद शाळा क्र.४ शेंदुरजनाघाट येथे जन्माष्टमी आणि गोपाळकाल्याचे औचित्य साधून ७ सप्टेंबरला वर्ग १ ते ४ मध्ये राधा–कृष्ण स्पर्धा आणि वर्ग ५ ते ७ मध्ये मटका फोड स्पर्धा घेण्यात आली.शेवटी मोठ्या उत्साहात दहीहंडी फोडून गोपाळकाला करण्यात आला. तसेच वर्ग ५ ते ७ च्या विद्यार्थीनींनी समुह नृत्य सादर करून कार्यक्रमात आणखी उत्साह निर्माण केला. स्पर्धेला परीक्षक म्हणून शाळा क्र.१ चे मुख्याध्यापक आशिष तडस आणि साहेबराव उईके यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन गुणदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा क्र.४ च्या मुख्याध्यापिका कांता हरले आणि सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करुन कार्यक्रम साजरा केला.

---

# पार्थ पवार यांना आरोपी का केले नाही? मुंढवा जमीन व्यवहार प्रकरणी हायकोर्टाचा पोलिसांना सवाल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांना आरोपी का करण्यात आले नाही, असा थेट सवाल उच्च न्यायालयाने उपस्थित केला.

न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने हा सवाल उपस्थित करताना राज्य पोलीस महासंचालकांना याप्रकरणी स्वतः प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. 'अल्मेडा एंटरप्रायझेस एलएलपी' या कंपनीने मुंढवा भागातील ४० एकर सरकारी जमीन तिच्या प्रत्यक्ष मूल्यापेक्षा खूपच कमी किंमतीत खरेदी केली होती.

पोलिसांना तपासादरम्यान असे निदर्शनास आले होते की, ही जमीन खरेदी करणाऱ्या कंपनीत पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील हे दोघे संचालक होते. मात्र, पोलिसांनी या प्रकरणात केवळ दिग्विजय पाटील यांना आरोपी केले आणि पार्थ पवार यांना आरोपी केले नाही, या बाबीकडे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने गांभीर्याने लक्ष वेधले.

वरील बाबी लक्षात घेता, पोलीस महासंचालक आणि तपास अधिकारी यांनी यावर उत्तर दाखल करावे, असे आदेश देऊन एकलपीठाने प्रकरणाची पुढील सुनावणी २८ सप्टेंबरपर्यंत तहकूब केली.

---

# सुमनबाई उपासे नेक्सस इंटरनॅशनल स्कूल व एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंट येथे गोपालकाला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***चांदस वाठोडा*** – न्यू पारंबी मल्टीपर्पज सोसायटी वाठोडा द्वारा संचालित सुमनबाई उपासे नेक्सस इंटरनॅशनल स्कूल व एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंट वाठोडा तर्फे नुकतेच गोपाळ काल्याचे आयोजन करण्यात आले होते. गोपाळकाल्यानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

नियोजित कार्यक्रमास संस्थाध्यक्ष रंजन उपासे, सचिव अनिल कांबळे, मुख्याध्यापिका रोशनी कांबळे, ग्रा.पं.सदस्य मीनाक्षी चोबितकर, पुनम उपासे, माधुरी हिवसे, चित्रा पाटणकर, उज्वला पवार उपस्थित होत्या. बाळकृष्णाचे पूजन व सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाची करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन संजीवनी मराठी व उपस्थितांचे आभार पूजा देशमुख यांनी मानले. उर्वरित कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी शिवम उपासे व विद्यार्थिनी स्वरा डांगे यांनी केले. मुख्याध्यापिका रोशनी कांबळे यांनी कृष्ण जन्मात श्रीकृष्णाने साकारलेल्या १४ विद्या व ६४ कला यांचे वर्णन करुन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यांचा उपयोग करुन स्वतःला कौशल्यवान बनवण्याचे आवाहन केले तसेच कृष्णाने संपुर्ण जीवनात सृष्टीच्या रक्षणाचे कार्य केले त्याचप्रमाणे आपणही सृष्टीचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन पालकांना केले. सर्व भाविक भक्तांनी प्री प्रायमरी व प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी कृष्ण जन्मावर आधारित सुंदर व आकर्षक नृत्य व नाटिका त्यांचा भावविभोर होऊन आनंद घेतला. शिक्षक दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. म्युझिक कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी गावकरी मंडळी, पालकांचा सहभाग व सहकार्य लाभले.

---


## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६३/२०२६** **ने.ता.१२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) कमलाबाई देवारावजी घोडे, वय अं.८४ वर्ष, धंदा–घरकाम
२) वनमाला बापुराव कराळे, वय अं.६० वर्ष,धंदा– घरकाम
३) राहुल बापुराव कराळे, वय अं.३९ वर्ष, धंदा–नोकरी
४) प्रज्ञा दिनेश ठाकरे, वय अं.३८ वर्ष, धंदा–घरकाम
५) संदीप रामचंद्र कराळे, वय अं.३९ वर्ष, धंदा–नोकरी
६) कल्याणी शंकर काळे, वय अं.४२ वर्ष, धंदा–घरकाम

अर्जदार क्र.१ ते ६ रा.नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत गंगा चंपतराव कराळे, रा.नागपूर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६०/२०२६** **ने.ता.०५/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) शांता दिगांबर वानखडे, वय अं.८० वर्ष, धंदा–घरकाम
२) युवराज दिगांबर वानखडे, वय अं.५२ वर्ष,धंदा– शेती
३) गोपाल दिगांबर वानखडे, वय अं.४२ वर्ष, धंदा–शेती
४) योगिता छत्रपती येवले, वय अं.४७ वर्ष, धंदा–घरकाम

अर्जदार क्र.१ ते ४ रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत दिगांबर नत्थुजी वानखडे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०५/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मराठा-मराठा संघर्ष झाल्यास त्याला सर्वस्वी शिंदेच जबाबदार, मनोज जरांगे यांचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जालना** – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे-पाटील यांनी बुधवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर जोरदार टीका करताना, सरकारला मराठा समाजामध्ये आपापसात फूट पाडावयाची आहे आणि त्यांना एकमेकांविरुद्ध लढवायचे असल्याचा, आरोप केला. जरांगे यांच्या उपोषणाचा बुधवारी १२ वा दिवस होता. विखे पाटलांनी केवळ गोड बोलून आणि पोकळ आश्वासने देऊन समाजाचा विश्वासघात केला आहे. येत्या १२ सप्टेंबरपर्यंत सरकारने मागण्या मान्य न केल्यास हे आंदोलन मुंबईत नेण्याचा इशाराही त्यांनी दिला. आहेत. १२ व्या दिवशी जरांगे यांची प्रकृती खालावल्याने बुधवारी सकाळी ११:३० च्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना सलाईन लावले. समितीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दावा केला की, मराठवाडा भागात कुणबी प्रमाणपत्रे नाकारण्याचे प्रमाण केवळ ०.३ टक्के प्रमाण केवळ ०.३ टक्के छत्रपती संभाजीनगर येथे कुणबी प्रमाणपत्रे आणि मराठा आरक्षणाच्या नोंदींसंदर्भात उच्चस्तरीय एवढेच आहे.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६५/२०२६ ने.ता.१२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) वसंतराव मारोतराव यावले, वय अं.७२ वर्ष, धंदा-शेती
२) उमेश वसंत यावले, वय अं.४९ वर्ष,धंदा- शेती
३) दिनेश वसंत यावले, वय अं.४६ वर्ष, धंदा-शेती
४) निलेश वसंतराव यावले, वय अं.४४ वर्ष, धंदा-शेती

अर्जदार क्र.१, ३ व ४ रा.उदापुर, ता.वरुड, जि.अमरावती
अर्जदार क्र.२ रा.नागपुर, ता.जि.नागपूर,

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत वासंती वसंत यावले, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०४/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७५९/२०२६ ने.ता.०९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) इंदुबाई बाबाराव बेलसरे, वय अं.७९ वर्ष, धंदा-घरकाम
२) संदीप बाबाराव बेलसरे, वय अं.५६ वर्ष,धंदा- नोकरी
३) अनिल बाबाराव बेलसरे, वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती
४) नितीन बाबाराव बेलसरे, वय अं.५३ वर्ष, धंदा-शेती

अर्जदार क्र.१, ३ व ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती
अर्जदार क्र.२ रा.सास नगर, मोहाली, ता.जि.मोहाली, (पंजाब)

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत बाबाराव गोविंदराव बेलसरे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०९/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०४/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६६/२०२६ ने.ता.१३/१०/२०२६**

**अर्जदार :-**

आशा विनोद वरुडकर
वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम
रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत विनोद आनंदराव वरुडकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०३/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६२/२०२६ ने.ता.१४/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) पुष्पा ओंकारराव गावंडे, वय अं.५६ वर्ष, धंदा-घरकाम
२) रुचीता ओंकारराव गावंडे, वय अं.२६ वर्ष,धंदा- घरकाम
३) सानिका ओंकारराव गावंडे, वय अं.२४ वर्ष, धंदा-शिक्षण
४) आदित्य ओंकारराव गावंडे, वय अं.१९ वर्ष, धंदा-शिक्षण

अर्जदार क्र.१ ते ४ रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत ओंकार भागवतराव गावंडे, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१४/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०३/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# एमपीएससी विरोधात जेन-झीचा आक्रोश : क्रांती चौकात विद्यार्थ्यांचा एल्गार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**छत्रपती संभाजीनगर** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकार, निकालातील विसंगती आणि पेपरफुटीच्या आरोपांमुळे राज्यातील स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त विद्यार्थ्यांनी मंगळवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात आक्रमक आंदोलन करीत एमपीएससीच्या कारभाराविरोधात जोरदार आवाज उठविला. 'परीक्षा आमच्या भविष्याची, मग निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता का नाही?' असा सवाल करीत विद्यार्थ्यांनी परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या परीक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा संशयाला वाव राहू नये, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. एमपीएससीच्या कारभारातील कथित त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण केला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात





आला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास राज्यभर आंदोलन उभारण्याची भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६४/२०२६ ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) वनिता अनिल जामुडकर/मगरे उर्फ वनिता अजय गजभिये
वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम
२) प्रगया अनिल जामुडकर/मगरे, वयअं.१७ वर्ष,धंदा- शिक्षण
दोन्ही रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती
ह.मु.रा.भोपाल, कोलार रोड, न्यु आंबेडकर नगर, हुझुर

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत अनिल शामराव मगरे, रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ३१/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८३/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) कुसुम रामराव घोटकर, वय अं.७५ वर्ष, धंदा- गृहिणी, २) गजानन रामरावजी घोटकर, वय अं.४३ वर्ष, धंदा- शेती, दोन्ही रा.जरुड, ३) चंदा सुभाष बोकडे, वय अं.५४ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.पांढुर्णा, ता.जि.पांढुर्णा, ४) वंदना रमेशराव कुऱ्हाडे, वय अं.५० वर्ष, धंदा- गृहिणी, रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती, ५) प्रतिज्ञा राजेंद्र माधवकर, वय अं.४१ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदुर बाजार

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामराव मारोतराव घोटकर, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०९/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६८/२०२६ ने.ता.१२/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) मोरेश्वर रामकृष्ण दिघेकर, वय अं.६५ वर्ष, धंदा-शेती, रा.बेनोडा (शहीद), २) मालती गणेशराव अटाळकर, वय अं.७१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.वर्धा, ३) सुशिला प्रल्हादराव माहुलकर, वय अं.६८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.गुरुकुंज मोझरी, ता.तिवसा, ४) नलिनी डिगांबर बगेकर, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, रा.हिवरखेड, ता.मोर्शी, ५) गिताबेन ज्ञानेश्वरराव सावरकर, वय अं.५७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.वडोदरा, ता.जि.वडोदरा (गुजरात), ६) लता विकास निलटकर, वय अं.५४ वर्ष, धंदा-घरकाम, रा.ब्राम्हणी, ता.कळमेश्वर, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामकृष्ण गोविंदराव दिघेकर व मयत नर्मदा रामकृष्ण दिघेकर, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०३/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६७/२०२६ ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) नितीन गिरीधर पोटे, वय अं.४५ वर्ष, धंदा-मजुरी
२) प्रवीण गिरीधर पोटे, वय अं.४६ वर्ष, धंदा- मजुरी
३) लिलाधर गोपाळराव पोटे, वय अं.६० वर्ष, धंदा- मजुरी
४) प्रशांत गोपाल पोटे, वय अं.५५ वर्ष, धंदा- मजुरी

सर्व रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत महादेवराव लहानुजी पोटे व मयत तुळसाबाई महादेवराव पोटे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०३/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




## महापालिकेत मराठीची परीक्षा पास व्हावीच लागेल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महापालिकेचे कामकाज हे शंभर टक्के मराठी असून प्रत्येक अमराठी कर्मचाऱ्याला मराठीची परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असते. परंतु आजवरच्या सेवेत ही परिक्षा उत्तीर्ण न होताही निवृत्तीनंतर त्याचे लाभ देण्यासाठी ही अट शिथिल करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत आला असता याला तीव्र विरोध करण्यात आला. मराठीची परिक्षा उत्तीर्ण व्हावीच लागेल आणि त्यामध्ये तडजोड नाही असे सागत हा प्रस्ताव पुन्हा प्रशासनाकडे पाठवण्यात आला.

# 'मी आमदार आहे, नगरसेवकाला विचारण्याची गरज नाही': गोलमैदानातील विकासकामावरून आयलानी-पांडे आमनेसामने

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**उल्हासनगर** – अतिक्रमण हटविण्यात आलेल्या गल्लीत पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी आमदार निधीतून सुरू करण्यात आलेल्या नूतनीकरणाच्या कामावरून भाजप आमदार कुमार आयलानी आणि शिवसेनेचे संतोष पांडे यांच्यात भररस्त्यात शाब्दिक खडाजंगी झाली. नगरसेवकाला विचारून काम सुरू केले का? असा सवाल पांडे यांनी केला. त्यावर मी आमदार आहे, मला नगरसेवकाला विचारण्याची गरज नाही, असे आयलानी यांनी प्रत्युत्तर दिल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. कॅम्प क्रमांक-२ मधील गोलमैदान परिसरात निरंकारी हॉल आणि देवी महल इमारतीदरम्यान राम जपो आश्रमाकडे जाणाऱ्या गल्लीत अनधिकृतपणे दुकान उभारण्यात आले होते. याबाबत आमदार आयलानी, नगरसेविका मीना आयलानी आणि नगरसेवक नंद छापरू यांनी महापालिका आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर अतिक्रमण हटविण्यात आले. पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून आमदार निधीतून गल्लीत नूतनीकरणाचे काम सुरू करण्यात आले.



यावेळी संतोष पांडे यांनी स्थानिक नगरसेवकांना विश्वासात न घेतल्याचा आक्षेप घेतला. पांडे यांनी अतिक्रमणाबाबत आपणही तक्रार केल्याचे सांगितले; मात्र पुराव्याच्या मुद्द्यावरून दोघांमध्ये वाद झाला. अखेर नारळ फोडून कामाचे भूमिपूजन करण्यात आले आणि वादावर पडदा पडला.

# यंदाचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून : १०० लाख मेट्रिक टन साखर उत्पादनाचा अंदाज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ऐन सणासुदीच्या काळात साखरेचे दर वाढल्याने यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिसमितीच्या बैठकीत घेण्यात आला.



सहकार विभागाच्या माहितीनुसार, यंदाच्या हंगामात राज्यातील २०० हून अधिक साखर कारखाने सुरू होऊन १०० लाख मेट्रिक टन साखर उत्पादन होण्याचा अंदाज आहे.

राज्य सहकारी साखर संघाकडे विविध साखर कारखान्यांनी १ ते १५ नोव्हेंबरदरम्यान गाळप हंगाम सुरू करण्याची मागणी केली होती. परंतु, देशभरात साखरेचे दर वाढल्याने सणासुदीच्या काळात ग्राहकांना त्याची झळ बसू नये, यासाठी यंदा गाळप हंगाम लवकर सुरू करण्याच्या सूचना केंद्र सरकारने दिल्या होत्या. शेजारील कर्नाटक राज्यात साखर कारखाने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात उसाचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी १५ ऑक्टोबर पासून गाळप हंगाम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना प्रतिवर्षी २०० कोटी याप्रमाणे पुढील सात वर्षासाठी १४०० कोटी रुपयांचे सुलभ कर्ज देण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. या कर्जातून कारखान्यांना व्याज सवलत दिली जाणार आहे.

राज्यातील २०२५-२६ चा गाळप हंगाम, उसाखालील क्षेत्र – १३.७२ लाख हेक्टर, गाळप घेतलेले कारखाने – २१०, एकूण ऊस गाळप – १ लाख ४५ हजार मेट्रिक टन, साखर उत्पादन – ९९.२० लाख मेट्रिक टन, एफआरपीनुसार अदा केलेली रक्कम – ४० हजार २४५ कोटी रुपये.

# आयपीओ आक्रसणार : एनएसईसाठी भागधारकांनी घेतली माघार

## सर्वात मोठ्या आयपीओचा विक्रम हुकणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसई) च्या प्रस्थापित भागधारकांनी ऑफर फॉर सेल (ओएफएस) मधून माघार घेतल्यामुळे, एनएसईच्या आयपीओचा आकार ५.२ ते ५.५ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. यापूर्वी हा हिस्सा ६ टक्के विकण्याचे नियोजित होते. याबाबतची माहिती घडामोडींशी परिचित सूत्रांनी बुधवारी दिली. ओएफएसचा आकार घटल्यामुळे आयपीओचा एकूण आकार ? २५,००० ते ? २७,००० कोटीपर्यंत खाली येऊ शकतो. तो आधी ३०,००० कोटींचा अपेक्षित होता. या आकारमानामुळे एनएसईचा आयपीओ हा भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ ठरण्यापासून मुकू शकतो. सध्या ह्युंदाई मोटर इंडियाचा २७,८७० कोटींचा आयपीओ हा देशातील सर्वात मोठा आयपीओ आहे. सुधारित प्राइस बँड : आयपीओचा किंमत पट्टा प्रति शेअर १,७०० ते १,७८५ दरम्यान असण्याची शक्यता आहे. यापूर्वी तो २,००० प्रति शेअर राहण्याचा अंदाज होता. महत्त्वाच्या तारखा : एनएसईचा आयपीओ १८ सप्टेंबर रोजी खुला होऊन २२ सप्टेंबर रोजी बंद होण्याची शक्यता आहे. २५ सप्टेंबर रोजी शेअर बाजारात शेअर्सची नोंदणी होण्याची शक्यता आहे. २६ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या 'पितृ पंधराव्या'पूर्वी ही लिस्टिंग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

जिओशी स्पर्धा : एनएसईच्या या आयपीओची थेट स्पर्धा उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या जिओ प्लॅटफॉर्म्सच्या संभाव्य आयपीओशी असेल. जिओच्या आयपीओचा आकार ?३७,७०० कोटी अंदाजित आहे, मात्र त्याच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.

नियामक मंजुरी आणि प्रमुख भागधारक गेल्या आठवड्यातच भांडवल बाजार नियामक 'सेबी'ने एनएसईला सार्वजनिक भागविक्रीसाठी हिरवा कंदील दिला.







